निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९३ वा.
मंगळवार - १६ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# बंजारा समाजाचा एल्गार एसटी आरक्षणासाठी प्रचंड मोर्चे





**आत्ताच एक्सप्रेस**
**बीड (प्रतिनिधी)** मराठा समाजाला हैद्राबाद गॅझेटियरचा आधार देत ओबीसी प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ मिळाल्यानंतर आता बंजारा समाजानेही आरक्षणासाठी ताकद दाखवायला सुरुवात केली आहे.

एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी राज्यभरात बंजारा समाज रस्त्यावर उतरला असून, आज सोमवारी (ता.१५) रोजी बीड येथील समाजबांधवांनी प्रचंड मोर्चा काढुनी शासनाचे लक्ष वेधून घेतले.बीड जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर काढलेल्या मोर्चात बंजारांची प्रचंड गर्दी झाली. मराठा आरक्षणासाठी संघर्षभूमी ठरलेल्या बीड जिल्ह्यात आता बंजारांचाही आ-वाज बुलंद होताना दिसला. राजकीय नेत्यांनी सुरुवातीला पाठ फिरवली असली तरी बंजारा समाजाच्या संघटनशक्तीपुढे सर्व नेते अखेर उभे राहिलेले दिसून आले.बीड लोकसभेचे खासदार बजरंग सोनवणे यांनी बंजारा समाजाच्या मागणीला उघड पाठिंबा दिला आहे. उपमुख्यमंत्री धनंजय मुंडे स्वतः मोर्चात सहभागी झाले, तर आमदार सुरेश धस, विजयसिंह पंडित, प्रकाश सोळंके यांच्यासह जिल्ह्यातील सर्व सहा आमदार बंजारांच्या समर्थनार्थ उभे राहिले. भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनीही मोर्चात उप-स्थित राहून ताकद दाखवली.

### काय म्हणाले धनंजय मुंडे

हैदराबाद गॅझेटमध्ये वेगवेगळ्या समाजाला वेगवेगळं आरक्षण आहे. त्यानुसार आता आधी-चे एसटी आणि नव्याने येऊ घातलेले एसटी यांचा मेळ घालावा, त्याचा अभ्यास करावा. त्यानुसार संविधानाच्या चौकटीत बसवून आरक्षण द्यावं अशी मागणी धनंजय मुंडे यांनी केली. बंजारा आणि वंजारी वेगवेगळे आहेत का? हे दोन्ही समाज एकच आहेत असंही धनंजय मुंडे म्हणाले.

### बंजारा-वंजारी एक नाहीत -राठोड

बंजारा वंजारी हे एक नाहीत, मी गोपीनाथ मुंडे यांचा खासगी सेक्रेटरी असताना देखील ही भूमिका घेतली होती. आपण भाऊ-भाऊ आहोत, सामाजिकदृष्ट्या ठीक आहे. मात्र, आरक्षणाच्या बाबतीत तुम्हाला वेगळं आरक्षण दिले पाहिजे, असे परखड मत बंजारा समाजाचे नेते हरिभाऊ राठोड यांनी व्यक्त केले. यापूर्वीच मी ही बाब सांगितलेली आहे. त्यामुळे, तो फॉर्मुला आत्ता वापरायला नको, असेही राठोड यांनी म्हटले.

**अडीच लाखांची लोकसंख्या – निर्णायक मतदानशक्ती**

बीड जिल्ह्यात बंजारा समाजाची लोकसंख्या तब्बल अडीच लाखांच्या घरात असून, सुमारे १.९० लाख मतदार आहेत.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर मतदारसंख्या असल्याने कोणताही पक्ष या समाजाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. गेवराई मतदारसंघातच तब्बल ६३ हजार बंजार मतदार आहेत. माजलगाव, परळी मतदारसंघात ७० हजार तर बीड आणि आष्टीत मिळून ५० हजार बंजार मतदार आहेत. जिल्ह्यातील तब्बल १,२८६ लमाण तांडे बंजारा समाजाच्या संघटनशक्तीचे दर्शन घडवतात.




**आगामी निवडणुकांवर बंजारांचा प्रभाव**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बंजारा समाजाचा हा मोर्चा राजकीय दृष्ट्या अतिशय महत्त्वाचा ठरत आहे. बंजारांचा पाठिंबा मिळविण्यासाठी सर्वच पक्ष प्रयत्नशील होतील, कारण त्यांच्या मतदानाशिवाय पंचायत समितीपासून जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये विजय मिळविणे कठीण आहे.

**हैद्राबाद गॅझेटियरचा आधार**

मराठा समाजाप्रमाणेच हैद्राबाद गॅझेटियरमध्ये बंजारांच्या नोंदीही सापडल्या आहेत. त्यावरूनच बंजारा समाज एसटी प्रवर्गातील आरक्षणाची मागणी करीत आहे. मराठा आंदोलनामुळे राज्य सरकारला निर्णय घ्यावा ला-गला होता, आता बंजारांचं आंदोलनही तसंच निर्णायक वळण घेण्याची चिन्हे दिसत आहेत.बीड-जालना जिल्ह्यांतील आजचा एल्गार हा केवळ आरक्षणासाठीचा मोर्चा नसून, आगामी निवडणुकांसाठी बंजारा समाजाच्या मतदानशक्तीचा इशारा असल्याचं स्पष्ट झालं आहे

## संक्षिप्त

### राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ

आत्ताच एक्सप्रेस
मुंबई /प्रतिनिधी/ गुजरात राज्याचे राज्यपाल असलेले आचार्य देवव्रत यांनी आज महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाची शपथ घेतली. राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात



मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी त्यांना राज्यपाल पदाची शपथ दिली. राज्यपाल श्री.देवव्रत यांनी संस्कृत भाषेतून शपथ घेतली.शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपाल देवव्रत यांचे पुष्प-गुच्छ देऊन अभिनंदन केले. आचार्य देवव्रत हे महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल आहेत.या शपथविधी सोहळ्याला विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, कौशल विकास, उद्योजकता, रोजगार व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, क्रीडा मंत्री ड.माणिकराव कोकाटे, मुख्य सचिव राजेश कुमार, अपर मुख्य सचिव (राजशिष्टाचार) मनीषा म्हैसकर व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.सुरुवातीला मुख्य सचिव राजेशकुमार यांनी श्री.देवव्रत यांच्या नियुक्तीसंदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तर सांगता राष्ट्रगीताने झाली. शपथविधीनंतर राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांना महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

राज्यपाल श्री.देवव्रत यांचा अल्प परिचय :
नाव : आचार्य देवव्रत, राज्यपाल, गुजरात
वडिलांचे नाव : श्री.लहरी सिंह
जन्मदिनांक : १८ जानेवारी १९५९
पत्ता : राजभवन, सेक्टर-२०, गांधीनगर - ३८२०२०, गुजरात
पात्रता :पदवीधर, पदव्युत्तर (इतिहास आणि हिंदी), बी.एड.योगशास्त्रातील डिप्लोमा नैसर्गिक चिकित्साशास्त्र व योगिक सायन्समध्ये डॉक्टरेट तसेच अनुभव हा अध्यापन व प्रशासन क्षेत्रात ४५ वर्षांचा अनुभवआहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यात स्वच्छता अभियानाची सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई /प्रतिनिधी**/आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात कौशल्य विकास विभागाच्यावतीने स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. कौशल्य विकास मंत्री श्री मंगल प्रभात लोढा यांच्या पुढाकारामुळे राज्यातील ४१९ शासकीय औद्योगिक संस्थांमधून हजारो विद्यार्थी एकत्र येणार असून, तब्बल ७५० गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवणार आहेत. या उपक्रमाचा शुभारंभ बुधवार, १७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायत कार्यालयासमोर होण-ार आहे. या अभियानाचे प्रमुख मार्गदर्शक आदरणीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीसजी असून, उद्घाटन कौशल्य विकास मंत्री श्री मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते होणार आहे.

या अभियानाबाबत बोलताना मंत्री लोढा म्हणाले, विकसित भारताचा संकल्प साकार करण्यातील एक महत्वाचा टप्पा म्हणजेच स्वच्छ भारत अभियान. भारत स्वच्छ करण्याचा निर्धार आदरणीय पंतप्रधानांनी केला असून, त्यासाठी एकत्र येण्याचे आ-वाहन आदरणीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीसजी यांनी सुद्धा केले आहे. त्यामुळे आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास विभागामार्फत आम्ही हा उपक्रम सुरु करत आहोत. स्वच्छता, आरोग्य या विषयांबाबत आजही जागृतीची गरज आहे आणि ती गरज या अभियानाच्या माध्यमातून आम्ही पूर्ण करू.प्रधानमंत्री आदरणीय श्री नरेंद्र मोदीजी यांच्या स्वच्छ भारताच्या निर्धाराला पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राच्या कौशल्य विकास विभागाद्वारे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. भारतातील पहिली संत गाडगे बाबा स्वच्छ भारत अकादमी महाराष्ट्रात सुरु करण्यात आली असून, याद्व-ारे हजारो तरुणांना प्रशिक्षण आणि रोजगार मिळत आहे. स्वच्छता आरोग्यासाठी अतिशय महत्वाची आहे हे आपण जाणतोच, पण भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशाला स्वच्छ ठेवण्यासाठी गरज आहे ती जनजागृतीची आणि कुशल मनुष्यबळाची. या दोन्ही गोष्टींसाठी महाराष्ट्राचा कौशल्य विकास विभाग तत्परतेने पुढाकार घेत राहील असे कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी स्पष्ट केले आहे.

# हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जर जरी जर बक्ष रह.यांच्या ७३९ व्या उरूसानिमित्त नगरपरिषदेकडून चादर अर्पण

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद/प्रतिनिधी/** खुलताबाद येथील हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन जर जरी जर बक्ष दूल्हा रह.यांच्या ७३९ व्या उरूसानिमित्त सालाबाद प्रमाणे यावर्षीही नगरपरिषद कार्यालयाच्या वतीने सोमवारी रोजी चादर मिरवणुक काढून हजरत ख्वाजा शेख मुन्तजबोद्दीन यांच्या दर्ग्यास अर्पण करण्यात आली.वैजापूर येथील प्रसिद्ध चाऊस बँडच्या बाज्यांच्या गजरात चादर मिरवणुकीला नगरपरिषद कार्यालयासमोरुन सुरुवात झाली. या प्रसंगी नगरपरिषद मुख्याधिकारी शेख समीर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे, दर्गा कमिटीचे अध्यक्ष एजाज अहमद, कार्यालयीन अधीक्षक रुस्तुम फुलारे, दर्गाह कमिटीचे उपाध्यक्ष इमरान जाग-ीरदार आणि सचिव मतीन जाग-ीरदार शेख युसुफोद्दीन चिरागोद्दीन यांची प्रमुख उपस्थिती होती.

या चादर मिरवणुकीस दर्गा कमिटीचे सदस्य सालेह मोहम्मद, मुबशीरोद्दीन, शेख कामरानोद्दीन, गुलाम मोईनोद्दीन, हबीबोद्दीन टेलर, नगर परिषदेचे स्वच्छता निरीक्षक अंकुश भराड, अशोक भंडारे, अश्विनी नंद, प्रज्ञा पवार, ऋषिकेश जो-



शी, ऋषिकेश सोनवणे, किशोर मोठे, नगरपरिषदाचे पाणीपुरवठा अभियंता श्रीहरी चौडेकर, लक्ष्मण तुपे, सतीश भालेराव, शुभम देवकर, संतोष आव्हाड, पुंडलिक शेलार, युसुफ बेग, जयकिसान दळवी, पाणीपुरवठा शेख इरफानोद्दीन, सय्यद वसीम, कासिम बेग, खास पटेल यासह मोठ्या संख्येने नागरिक आणि नगरपरिषद कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

विशेष म्हणजे या चादर मिरवणुकीत सहभागी नगरपरिषद कार्यालयातील अधिकारी कर्मचारी व नागरिकांनी फेटे बांधून सहभाग नोंदवला, ज्यामुळे मिरवणुकीचे दृष्य शहरातल्या नागरिकांचे लक्ष वेधून घेणारे ठरले.

# मुक्त विद्यापीठाचे पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांना १ ऑक्टोबर पर्यंत परीक्षा अर्ज भरण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**
**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमाच्या (कृषी पदविका शिक्षणक्रम वगळता) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची परीक्षा संभाव्यपणे येत्या दिनांक २३ डिसेंबर २०२५ पासून आयोजित करण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. त्यामुळे सर्व पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी अनुत्तीर्ण विषयाचे परीक्षा अर्ज विद्यापीठाच्या संकेत स्थळास भेट देवून विनाविलंब शुल्कासह येत्या दिनांक १६ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने भरा-वेत, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या विविध शिक्षणक्रमात प्रवेशित नियमित विद्यार्थ्यांची सत्र व मागील परीक्षेतील अनुत्तीर्ण विषयाची पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांची हिवाळी परीक्षा येत्या २३ डिसेंबर २०२५ पासून आयोजित करण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे.

सदर परीक्षेकरिता ऑनलाईन परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासह सादर करण्याची मुदत ही दिनांक १६ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२५ अशी आहे. विलंब शुल्कासह येत्या दिनांक २ ते ७ ऑक्टोबर पर्यंत तर विशेष विलंब शुल्कासह दिनांक ८ ते १२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हा ऑनलाईन परीक्षा अर्ज भरता येईल. मात्र यानंतर कुठल्याही कारणास्तव मुदतवाढ मिळणार नाही. ऑनलाईन परीक्षा अर्ज हा https://ycmou.digitaluniversity.ac/PreExamv2šExamformSubmissionšPpamatWise.asु या लिंक वर उपलब्ध आहे. परीक्षा शुल्क हे केवळ ऑनलाईन भरता येईल.



प्रत्येक विद्यार्थ्याने परीक्षेच्या अद्ययावत माहितीसाठी, वेळापत्रकासाठी, वेळापत्रकातील होणाऱ्या संभाव्य बदलाबाबत विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ https://ycmou.digitaluniversity.ac/Content.aspx?ID=1494 यास वेळोवेळी भेट द्यावी. यासंदर्भात काही अडचण आल्यास परीक्षा विभागाच्या विद्यार्थी सुविधा केंद्राशी क्रमांकावर सुटीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत संपर्क साधा-वा, असे आवाहन विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या शेवटी केले आहे.

### बीड जिल्ह्यातील सर्व शाळास आज सुट्टी चा आदेश



**आत्ताच एक्सप्रेस**
**बीड/ प्रतिनिधि /** सोमवारी बीड जिल्ह्यात पावसाने हाहाकार माजला असून अनेक गावांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. यामुळे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष या नात्याने बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी मंगळवार दि.१६ सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थाना सुट्टी जाहिर केली आहे. हवामान विभागाने दिलेल्या पुर्वसुचनेनुसार जिल्ह्यात दि.१४ पासून मुसळ-धार पाऊस कोसळत आहे. बीड जिल्ह्यात अनेक तालुक्यात नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. यामुळे जिल्ह्यात अनेक भागात पुरस्थिती निर्माण झाली आहे. जिल्ह्यात कुठेही अनुचित प्रकार घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपातकालीन स्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होवू नये म्हणून जिल्ह्यातील सर्व शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना दि. १६ सप्टेंबर मंगळवार रोजी सुट्टी जाहिर करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला.

# निसर्ग कवी ना धो महानोर!

मराठी साहित्यातील अनमोल रत्न , निसर्ग कवी ना. धो. महानोर यांची आज जयंती. निसर्गकवी ना धो महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेड येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आईवडील शेतमजूर होते. दुसऱ्याच्या शेतात जाऊन ते राबत असे. ना धो महानोरांना चार भाऊ व तीन बहिणी होत्या. ना धो हे त्यात सर्वात थोरले. त्यांचे प्राथमिक शाळेत गावातच झाले मात्र माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्यांना शेंदुर्णीच्या शाळेत जावे लागले. शेंदुर्णीची शाळा गावापासून दहा बारा किलोमीटर अंतरावर होती. दहा बारा किलोमीटर पायी चालत जाऊन ते शाळेत जात. शाळेत असतानाच त्यांना कवितेची गोडी लागली. शाळेत असतानाच ते कविता करत. लहानपणापासूनच त्यांना शेत, शिवार, निसर्ग यांची आवड होती त्यामुळे ते त्यावरच कविता करत. लहानपणी लागलेली कवितेची गोडी पुढेही कायम राहिली. मॅट्रिक पास झाल्यावर ते जळगांवला उच्चशिक्षण घेण्यासाठी गेले. तिथे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयात कला शकत प्रवेश घेतला. तिथे त्यांची काव्य प्रतिभा बहरली. त्यांच्यात असलेली काव्य प्रतिभा ओळखून महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. दुर्दैवाने घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना उच्च शिक्षण अर्ध्यावर सोडून घरी परतावे लागले. घरी आल्यावर ते शेतीत रमले. शेतशिवारात राबतच त्यांनी आपल्या कविता करायला सुरुवात केली. शिक्षण थांबले पण कविता थांबली नाही. ते शेत शिवारात रमून कविता करू लागले. शेत शिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतून निसर्गाची अमाप उधळण केली. त्यांच्या अदभुत निसर्ग कवितांनी त्यातल्या रंग गंधानी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद - लईंनी वाचक रसिकांना वेड लावले. रानात राहणाऱ्या ना धो महानोर सरांच्या कवितेचं केंद्रस्थान होते ते निसर्ग आणि स्त्रिया. निसर्ग आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या. त्यांची एकूण अकरा कविता संग्रह प्रसिद्ध असून अजिंठा नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. यादरम्यान त्यांनी गद्य लेखनही सुरू ठेवले. गांधारी ही कादंबरी, गपसप व गावाकडच्या गोष्टी या लोककथा संग्रह, यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, शरद पवार आणि मी, आनंदयोगी पु ल. ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी जरी गद्य लेखन विपुल प्रमाणात केले असले तरी त्यांचे पहिले प्रेम कवितेवरच होतं. त्यांनी अनेक चित्रपटांची गाणी देखील लिहिली आहेत. जैत रे जैत चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठावर आजही कायम आहेत. ना धो महानोर सर सहा वर्ष विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्रामीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केले. महानोर सरांना अनेक पुरस्कार मिळाले अगदी पद्मश्री देखील मिळाली मात्र निसर्ग कवी ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ मानत. ३ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गात रमणारा हा निसर्ग कवी सर्वांना सोडून गेला. ना धो महानोर सर जरी कायमचे निघून गेले असले तरी रसिकांच्या आणि वाचकांच्या मनात ते कायम निसर्ग कवी म्हणूनच स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. निसर्ग कवी ना. धो. महानोर यांनी आपल्या कवितेतून मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. निसर्ग कवी ना धो महानोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी वीरेंद्र सोळंके

**आत्ताच एक्सप्रेस**

**माजलगाव /प्रतिनिधी**/येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके नागरी सहकारी पतसंस्था, माजलगावच्या चेअरमनपदी श्री. वीरेंद्र प्रकाशदादा सोळंके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या सभागृहात गुरुवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा ठराव एकमताने मंजूर झाला असून, एस. के. शेरखाने (सहकार अधिकारी, श्रेणी-२) यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण निवड प्रक्रिया नियमानुसार आणि पारदर्शकपणे पार पाडण्यात आली. विशेष म्हणजे, वीरेंद्र सोळंके हे आधीच लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून यशस्वीपणे कारभार पाहत आहेत आणि आता पतसंस्थेचे नेतृत्वही त्यांच्या हाती आल्यामुळे या दोन्ही महत्त्वाच्या सहकारी संस्थांचे कारभार अधिक सक्षम आणि गतिमान होणार असल्याची खात्री व्यक्त केली जात आहे. बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व संचालकांनी सोळंके यांच्या नेतृत्वावर एकमताने विश्वास व्यक्त केला असून, त्यांना पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.



सविस्तर वृत्त असे की, या निवडीबद्दल माजलगाव व परिसरातील नागरिक, संस्थेचे सभासद, स्थानिक शेतकरी, व्यापारी वर्ग, सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय व्यक्तिमत्त्वांसह विविध सामाजिक संघटनांकडून सोळंके यांचे हार्दिक अभिनंदन होत आहे. लोकनेते सुंदररावजी सोळंके हे या भागातील सहकारी चळवळीचे अग्रणी व्यक्तिमत्त्व होते आणि त्यांच्या नावावर असलेल्या या दोन्ही संस्थांचे आता त्यांच्या वारसाच्या हाती एकत्रित नेतृत्व आल्याने येथील सहकारी चळवळीला नवी दिशा मिळणार असल्याची व्यापक अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्थानिक समुदायाने या दुहेरी जबाबदारीच्या निवडीचे स्वागत केले आहे आणि सोळंके यांच्या अनुभवी नेतृत्वामुळे दोन्ही संस्थांच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा होणार असल्याची आशा व्यक्त केली जात आहे.

या प्रसंगी बोलताना वीरेंद्र सोळंके यांनी संस्थेच्या आर्थिक विकासासाठी, सदस्यांच्या कल्याणासाठी, शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी आणि साखर कारखान्याच्या उत्पादनक्षमतेत वृद्धी करण्यासाठी आणखी नवे उपक्रम राबवण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला आहे. त्यांनी उल्लेख केला की, संस्थेने नुकताच ९० कोटी रुपयांच्या ठेवीचा महत्त्वाचा टप्पा यशस्वीरीत्या पार केला आहे आणि मार्च २०२६ पर्यंत १२५ कोटी रुपयांच्या ठेवीसह एकूण व्यवसाय २०० कोटी रुपयांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी लक्ष्य त्यांनी ठेवले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, दोन्ही संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी, त्यांच्या जीवनमानात सुधारणा आणण्यासाठी तसेच भविष्यकाळातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू. या निवडीमुळे माजलगाव परिसरातील सहकारी क्षेत्राच्या विकासाला गती मिळणार असून, शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलली जाणार असल्याची तसेच संस्थेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन सदस्यांना अधिक फायदे मिळणार असल्याची अपेक्षा स्थानिक समुदायाने व्यक्त केली आहे. संचालक मंडळातील सर्व सदस्यांनी त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या असून, संस्थेच्या प्रगतीसाठी सामूहिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध परळीत गुन्हा दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी/ प्रतिनिधि**/मराठा समाजाबद्दल जाती आधारित वक्तव्यामुळे आमचा अपमान व मानहानी झाली असुन याबाबत गुन्हा दाखल करावा अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली होती. या अनुषंगाने परळी पोलीस ठाण्यात लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे या दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पोलिस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार परळीतील मराठा समाज बांधवांनी पोलीस स्टेशनला एका निवेदनाद्वारे लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. या अनुषंगाने वरिष्ठांचे निर्देश घेऊन परळी पोलिसांनी या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला केला आहे. याबाबत देवराव लुगडे यांनी दिलेल्या फिर्यादीत हाके हे भाषणामध्ये मराठा समाजाला उद्देशून म्हणाले की, तुम्ही आता ओबीसी मध्ये आलात, आता पहीले ११ विवाह आपल्या आपल्या मध्ये ठरवूयात, तुम्ही आमच्यात आल्याने जात पात राहीली का? पाटील, ९६ कुळी, क्षत्रिय तुम्ही राहीलात का? तसेच त्याच व्हीडीओ मध्ये नवनाथ वाघमारे रा. जालना यांनी मराठवाड्यातील मराठा समाज हा निजामाची औलाद असुन या निजामाच्या औलादीला आपल्या आरक्षणामध्ये घेवु नका असे वक्तव्य केले होते. ही विधाने जातीच्या आधारावर अपमान होईल असे मराठा समाजा विषयी भाषण केले.

# खरात आडगाव फाटा येथे ओबीसी समाजाचा रास्ता रोको

**आत्ताच एक्सप्रेस**

**माजलगाव/प्रतिनिधी/ शेख हमीद**/महाराष्ट्र शासनाने नुकताच एक जीआर काढून मराठा समाजाला हैदराबाद गॅजेट लागू करून ओबीसीतून आरक्षण देण्याचा प्रयत्न केलेला आहे यामुळे ओबीसी समाजावर मोठा अन्याय होणार आहे सदर जीआर रद्द करून मराठा समाजाचे ओबीसी आरक्षणावर होणारेअतिक्रमण थांबवण्यात यावे या मागणीसाठी आज खरात आडगाव फाटा येथे भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी परिसरातून हजारोंच्या संख्येने ओबीसी बंधू उपस्थित होते भुजबळ साहेब तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला यावेळी माजलगाव पोलीस प्रशासनाचे वतीने चोक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता एक तास झालेल्या रास्ता रोको ने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या यावेळी माजलगावच्या तहसील कार्यालयातील नायब तशिलदार यांनी आंदोलन कर्त्याचे निवेदन स्वीकारले यावेळी माजलगाव तालुक्यातील बहुसंख्य ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता यावेळी प्रमुख माजलगाव ओबीसी नेते संतोष रासवे जगन्नाथ खेत्री दशरथ आढाव किशोर पाचाळ निवृत्ती रासवे प्रकाश आढाव साहेबराव आढाव बाबा हांके विलास मेमाणे वैभव पाचाळ मछिंद्र आढाव लखण आढाव कोरबे सचिन रासवे बाबासाहेब आढाव दिवटे मंगेश रासवे शिवाजी आढाव गडदे समाधान रासवे आनंत आढाव पुरुषोत्तम यमगर संतोष कावळे अशोक मामा रासवे महादेव नाना आढाव बाबुराव हांके अशोक शिंदे कपिल रासवे परसु आढाव बहुसंख्य नेते उपस्थित होते.



# खेळ हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे -प्रा.कोकलगावे

**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी वैजनाथ /प्रतिनिधी**/ येत्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री लोकनेते कै. सुंदरराव सोळंके साहेब यांच्या जयंती निमित्त थर्मल कॉलनीतील न्यू हायस्कूल ज्युनिअर कॉलेज येथे व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी बोलताना जेष्ठ प्राध्यापक आर.एम. कोकलगावे यांनी खेळ हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे तसेच खेळाने शारीरिक आणि मानसिक विकास होतो असे प्रतिपादन केले.



शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके काका यांच्या मार्गदर्शनानुसार व महाविद्यालयाचे प्राचार्य श्री किशन मोरे व उपप्राचार्य श्री सुनील लोमटे यांच्या नियोजनानुसार सदरील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन उपप्राचार्य सुनील लोमटे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन स्पर्धेचा उद्देश विशद केला.महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यावेळी अकरावी व बारावी वर्गाच्या वेगवेगळ्या टीम स्पर्धेमध्ये सहभागी झाल्या होत्या.

पुढे बोलताना प्रा.कोकलगावे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी खेळाचे जीवनामध्ये असणारे महत्त्व लक्षात घेऊन स्वतःमध्ये खिलाडू वृत्ती निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.या प्रसंगी प्रा.रविशंकर स्वामी,क्रिडा मार्गदर्शक प्रा.अनिल इथापे,प्रा.जयंत फूलेकर,प्रा.डॉ. अंकुराराव वाघमारे,प्रा सुरजकुमार मुंडे,प्रा.बाळासाहेब देशमूख,प्रा. सुनील बिराजदार,प्रा.संभाजी राख,प्रा.नेहरकर सर,प्रा.बालासाहेब राऊत,प्रा.राहूल नलावडे,प्राध्यापिका भालेराव मॅडम,प्राध्यापिका खंडागळे मॅडम श्री शंकर बादाडे ,महादू कांबळे तसेच इतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस येत्या ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांना येत्या दिनांक ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विद्यापीठाने आपल्या १२ विविध विद्याशाखांच्या १३८ वेगवेगळ्या प्रकारच्या पदवी, पदव्युत्तर, पदविका आणि प्रमाणपत्र शिक्षणक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन सुरू केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) नवीन नियमानुसार विद्यार्थ्यांना नियमित पदवीसोबत दुरशिक्षणाद्वारे अधिकची एक पदवी मिळवता येईल किंवा मुक्त विद्यापीठाच्याच दोन पदव्यांना एकाचवेळी प्रवेश घेता येईल.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली या वर्षी विद्यापीठाने पारंपारिक शिक्षणक्रमांसह नवीन आणि व्यावसायिक शिक्षणक्रम देखील सुरु केलेले आहेत. त्यात विशेषतः संगणकशास्त्र, विज्ञान व माहिती तंत्रज्ञान, कृषी तसेच व्यावसायिक क्षेत्रातील बदलत्या गरजा लक्षात घेऊन डेटा नालिटिक्स, आयबीएम सर्टिफिकेट, डिजिटल फोटोग्राफी, शेतकरी उत्पादक कंपनी व्यवस्थापन, श्वानपालक प्रबोधन, सौर व पवन उर्जा आदींशी संबंधित नवीन शिक्षणक्रम यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना घरबसल्या आणि त्यांच्या सवडी व आवडीनुसार शिक्षण पूर्ण करण्याची संधी मुक्त विद्यापीठ दूरस्थ शिक्षण प्रणालीतून उपलब्ध करून देत आले आहे. नोकरी - व्यवसाय करणारे, गृहिणीं किंवा ज्यांना नियमित महाविद्यालयात जाणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांसाठी ही एक उत्तम संधी आहे. प्रवेश घेण्यासाठी इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी विद्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड व विद्यार्थी सेवा विभाग संचालक डॉ. प्रकाश देशमुख यांनी केले आहे.



## गणेशपार दूरर्गोस्तव मंडळाच्या अध्यक्ष पदी शिवाजी देशमुख सचिवपदी बाळासाहेब देशमुख यांची निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी / प्रतिनिधि** / शरातील जूना गांव भागात गणेश पर दुर्गा उत्सव २०२५ ची कार्यकारणी संपन्न झाली असून अध्यक्ष पदी शिवाजी देशमुख यांची निवड झाली असून सचिव पदी बाळासाहेब देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.उर्वरित कार्यकारणी पदी कोषाध्यक्ष,नारायण डाके यांची निवड करण्यात आली आहे.उपाध्यक्ष पदी, रमेश पवार, दीपक जोशी कार्याध्यक्ष,सचिन स्वामी यांची निवड करण्यात आली आहे. तर प्रसिद्धी प्रमुख,प्रकाश वर्मा यांची नियुक्ति करण्यात आली आहे.दि. १४ रोजी गणेशपार सार्वजनिक दूर्गोस्तव मंडळ ची बैठक संपन्न झाली असून माजी अध्यक्ष यांच्या उपस्थितित नविन नियुक्ति करण्यात आली..गांव भागात जूनी रूढ़ि परंपरा चालत असलेले गणेशपार भागतिल दूर्गोस्तव म्हणजे गणेशपार सार्वजनिक दुर्गोस्तव विशेष म्हणजे अष्ट धातु मधे देवी ची मूर्ति असून सर्व गणेशपार भागात विशेष विद्युत रोशनई मुळे नवरात्री चे दिवस म्हणजे गांव भागात पंच क्रोशीतील भाविक दर्शनसाठी येतात विशेष अष्ट धातु मूर्ति देखावा या भागतिल येणाऱ्या सर्व भाविक भक्ताना प्रति वर्षी आकर्षण होते या सार्वजनिक कार्यक्रमात नविन ठराव झालेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत केले जात आहे.

# श्राद्धाने नव्हे, प्रेमाने आई-वडील जिवंत ठेवा!

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत आपण अनेक गोष्टींना प्राधान्य देतो. नोकरी, व्यवसाय, पैसा, समाजातलं स्थान, मित्रमंडळींचा सहवास. मात्र या सगळ्यांच्या मागे धावताना आपल्या आयुष्याचा मूळ आधार असणाऱ्या आई-वडिलांकडे आपण किती वेळ देतो, हे पाहणं गरजेचं आहे. या काळात आपण घरं मोठी बांधली, गाड्या विकत घेतल्या, परदेशात पोहोचलो; पण आई-वडिलांसाठी वेळ देणं मात्र दुर्मिळ झालं आहे. हेच आपल्या संस्कृतीचं सर्वात मोठं दुर्दैव आहे.

बालपणी आपल्या छोट्याशा हसण्यासाठी, एका खेळण्याच्या हट्टासाठी आई-वडिलांनी दिवस-रात्र घालवले. स्वतःच्या स्वप्नांना विराम देऊन त्यांनी आपली स्वप्नं पूर्ण केली. थकलेले असतानाही आईनं आपल्या पोटाला चिमटा काढत आपल्याला पोटभर खाऊ घातलं, वडिलांनी घामाने न्हाऊनसाखून आपल्यासाठी पै-पै जमवली. आपल्या प्रत्येक गरजेवर स्वतःच्या सुखाचा त्याग केला. शिक्षण, संस्कार, स्वप्नं. हे सर्व काही आपल्या मुलांना मिळावं म्हणून त्यांनी आपलं तारुण्य खर्च केलं. पण आज त्यांचं वय वाढलं, पाय कमजोर झाले, डोळ्यांची दृष्टी मंदावली, तरीही त्यांची अपेक्षा मोठी नसते. त्यांना फक्त आपल्या मुलांचं दोन प्रेमळ शब्द, थोडा वेळ, आणि साधं पण आपुलकीनं वाढलेलं अन्न हवं असतं.

आज तेच आई-वडील वृद्ध झालेत. चालणं मंदावलं, डोळ्यांची दृष्टी कमी झाली, पण अपेक्षा वाढल्या नाहीत. त्यांना फक्त मुलांनी वेळ काढून बोलावं, सोबत जेवावं, एक प्रेमळ शब्द बोलावा, एवढंच पुरेसं असतं. मात्र वास्तव भीषण आहे. आपण अनेकदा पाहतो की आई-वडील वृद्धाश्रमात राहायला भाग पाडले जातात. बऱ्याच ठिकाणी आई-वडील दुर्लक्षित आहेत, काहींना वृद्धाश्रमात पाठवून दिलं जातं. पैशापाठी धावणाऱ्या पिढीला हे समजत नाही की, आई-वडिलांचा आशिर्वादच आपल्या आयुष्याचं खरं धन आहे. काही मुलं वारंवार वेळ नाही, कामं खूप आहेत असं म्हणून त्यांना दूर ठेवतात. पण खरी गोष्ट अशी आहे की वेळ आपल्याकडे आहे, फक्त प्राधान्य बदललेलं आहे.

आजची पिढी तंत्रज्ञानात, करिअरमध्ये, पैशाच्या मागे इतकी धावते आहे की 'आशीर्वाद' या अमूल्य संपत्तीचं महत्व विसरली आहे. आई-वडिलांचा हात डोक्यावर असेपर्यंत आपण सुरक्षित आहोत. तो हात निघून गेला की, कोणतेही श्राद्ध आपल्याला ती उब परत देऊ शकत नाही.

आपल्या समाजात एक विचित्र विडंबन पाहायला मिळते. आई-वडील जिवंत असताना त्यांना चार गोड बोल बोलायला, त्यांच्या सोबत बसून दोन घास जेवायला, त्यांच्या औषधोपचारांसाठी पैसा खर्च करायला अनेकदा हात आखडता घेतो. पण ते या जगातून गेल्यावर मात्र मोठ्या थाटामाटात दहावे, तेरावे, श्राद्ध, पिंडदान यांसारखे विधी करतो. समाजाला दाखवण्यासाठी केलेले हे आडंबर खऱ्या अर्थाने 'प्रेमाचा देखावा' ठरतो. ज्या आईनं उपाशीपोटी राहून मुलांना खाऊ घातलं, ज्या वडिलांनी अंगावरच्या घामाच्या धारा गाळून मुलांचं भविष्य घडवलं, त्यांच्यासाठी एक ग्लास पाणी जिवंत असताना वेळेवर द्यायला जमलं नाही, तर मृत्यूनंतर पिंडदान करून त्याचा काय उपयोग? खरी सेवा ही जिवंतपणी केली जाते, मृत्यूनंतर केलेली सेवा केवळ औपचारिकता उरते.

आज समाजात हे प्रमाण वाढत चाललं आहे. वृद्ध आई-वडिलांना 'ओझं' समजून त्यांना दुर्लक्षित केलं जातं. काहींना तर वृद्धाश्रमात ढकलून दिलं जातं. आणि नंतर त्यांच्या मृत्यूनंतर समाजात प्रतिष्ठा टिकवण्यासाठी धूमधडाक्यात श्राद्ध केले जातात.

हा दांभिकपणा लपवून ठेवता येत नाही. श्राद्ध, तर्पण, दहावे-तेरावे या परंपरांचा हेतू वेगळा होता. मृत व्यक्तीच्या स्मृतींना श्रद्धांजली वाहणं, कृतज्ञता व्यक्त करणं. पण आज ते स्पर्धा, प्रतिष्ठा आणि दिखाव्याचं साधन बनलं आहे. लोकांना समाजात आपलं 'नाव' हवं असतं, पण आई-वडिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचं महत्व समजत नाही.

आई-वडिलांच्या आठवणी, त्यांच्या आशीर्वादांची किंमत आपल्याला ते या जगातून गेल्यावरच प्रकर्षानं जाणवते.

समाजाला यावेळी एक मोठा प्रश्न विचरावा लागतो, जिवंत असताना थोडं प्रेम, थोडा वेळ, थोडं सांत्वन दिलं असतं, तर श्राद्धासाठी हजारो रुपयांचा खर्च करण्याची गरज पडली असती का?

म्हणूनच आजच्या समाजाला हे आवर्जून सांगावंसं वाटतं, आई-वडील जीवंत असताना त्यांना चांगलं खाऊ घाला, वेळ द्या, प्रेम द्या, जपा, सेवा करा. मृत्यूनंतरच्या विधींना अर्थ नाही, खरी पूजा ही त्यांना हसतमुख ठेवण्यात आहे.

त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेलं समाधानाचं हास्यच तुमच्या आयुष्याचं खऱ्या अर्थानं यश आहे. त्यांच्या डोळ्यातील आनंदच तुमच्या आयुष्याचं खरं धन आहे. समाजाला यावेळी एक मोठा प्रश्न विचारावा लागतो, जिवंत असताना थोडं प्रेम, थोडा वेळ, थोडं सांत्वन दिलं असतं, तर श्राद्धासाठी हजारो रुपयांचा खर्च करण्याची गरज पडली असती का?श्राद्ध नव्हे, जिवंतपणीचं प्रेम हेच खऱ्या अर्थानं आई-वडिलांना अर्पण केलेलं तर्पण आहे.

**-प्रवीण बागडे**
**नागपूर**

## मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन:मुख्य शासकीय सोहळा सिद्धार्थ उद्यान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचा मुख्य शासकीय सोहळा बुधवार दि.१७ रोजी सकाळी ९ वा. सिद्धार्थ उद्यान येथील स्मृतिस्तंभाजवळ होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा ध्वजारोहण सोहळा होणार आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस हे स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन मुक्तिसंग्रामातील हुतात्म्यांना मानवंदना देतील. स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, त्यांचे नातेवाईक, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, पत्रकार, नागरिक आदींनी या सोहळ्यास उपस्थित रहावे,सए आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात अतिरेकी हल्ला प्रतिकार प्रात्यक्षिक सराव

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात अतिरेकी हल्ला प्रतिकाराची प्रात्यक्षिके करुन सराव करण्यात आला.दहशतवादी हल्ल्यासारखी आपत्ती उद्भवल्यास परिस्थिती हाताळण्याची सज्जता असावी यासाठी हा सराव करण्यात आला.या सरावाची पूर्वतयारी करण्यात आली. त्यानुसार आज प्रत्यक्ष सकाळी १० ते १२ या वेळात जिल्हाधिकारी कार्यालयात प्रात्यक्षिक सरावाचा थरार सुरु होता. जलद प्रतिसाद दलाचे पीएसआय सतिष दिंडे, कमांडो प्रशिक्षक आकाश घोडके, अजिंक्य गाजरे व अन्य्त २२ कमांडो, तसेच बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे १ अधिकारी ७ अंमलदार व १३ कमांडो हजर होते. अतिरेक्यांनी केलेला हल्ला, दडून बसलेल्या अतिरेक्यांचा शोध, ओलीस ठेवलेल्या नागरिकांची सुटका कउन अतिरेक्यांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन करणे इ. अभ्यास या प्रात्यक्षिक सरावात करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांच्या निरीक्षणात हा सराव अभ्यास करण्यात आला,असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती म्हस्के यांनी कळविले आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्रामातील हुतात्म्यांच्या ग्रंथांचे प्रदर्शन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून वर्तमान काळातील तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल व व्हाट्सअप सारख्या सोशल मीडियाच्या युगामध्ये आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांची ग्रंथाच्या माध्यमातून यशोगाथा वाचता यावी. तसेच आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याची जाणीव जागृती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी, मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास विद्यार्थ्यांच्या परिचयाचा व्हावा या उदात्त हेतूने ग्रंथालय व ज्ञान संसाधन केंद्रा मार्फत देवगिरी महाविद्यालयाच्या ग्रंथालय परिसरात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १५ ते १७ सप्टेंबर २०२५ या कालावधीमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या ग्रंथ प्रदर्शनाचा आस्वाद घेता येईल.

या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन देवगिरी महाविद्यालय विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य पंडितराव हर्षे (अण्णा), मा. श्री शेख सलीम शेख अहमद, उपाध्यक्ष, म.शि. प्र.मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते, उपप्राचार्या डॉ. अपर्णा तावरे, ग्रंथपाल डॉ. सुदेश डोंगरे, डॉ. सोनल देशमुख, डॉ. उज्वला मगरे व समस्त ग्रंथालयीन कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

उदघाटन प्रसंगी श्री शेख सलीम शेख अहमद म्हणाले कि, भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे अत्यन्त पराकोटीच्या संघर्षातून मिळाले आहे. आपल्या स्वातंत्र्याला मोठा त्यागाचा आणि बलिदानाचा इतिहास आहे. जगावर राज्य करणाऱ्या महाशक्तीने भारतावरही कब्जा मिळविला होता. यातून मुक्ततेचा इतिहास म्हणजे भारतीय स्वातंत्र्य होय. असाच संघर्ष निजामशाही राजवटीतून मुक्त होण्यासाठी मराठवाड्यालाही करावा लागला यामुळे आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य आपण जपले पाहिजे व ते टिकविण्यासाठी आजच्या मोबाईल व व्हॉट्सअप मिडीयाच्या युगामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्याला



मिळालेल्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांची ग्रंथ गाथा वाचता यावी व स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्यासाठी जागरूक व्हावे या उद्देशाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.विद्यार्थ्यांनी जीवनात समृद्धता व विकास करायचा असेल तर वाचनाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनात शिकत असताना वेळेचा सदुपयोग वाचनासाठी करावा, कारण वाचाल तर वाचाल ! अशीच भूमिका आपणास घ्यावी लागेल. ग्रंथ हे जीवन जगण्यासाठी दिशा दाखवितात असे प्रतिपादन देवगिरी महाविद्यालयात ग्रंथालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी केले.हे ग्रंथ प्रदर्शन दिनांक १५ ते १७ सप्टेंबर, संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले ठेवण्यात आले. या ग्रंथ प्रदर्शनाचा अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन ग्रंथपाल डॉ. सुदेश डोंगरे यांनी केले आहे.

## जार सावंगी येथील ३५ वर्षीय तरुण बेपत्ता

**आत्ताच एक्सप्रेस**

**बाजार सावंगी/प्रतिनिधी**/खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील रहिवासी विजय रामराव नलावडे ( वय.३५) हा तरुण ( दि.१४) रविवार रोजी सकाळी चार वाजता घरातील सदस्यांना न सांगता घरातून निघुन गेला आहे. दोन दिवस झाले घरी परतला नाही अंगामध्ये पांढऱ्या रंगाचा चौकटी



शर्ट आहे, रंग गोरा,सड पातळ बांधा,उंची पाच फुट,असे वर्णन आहे कुणाला आढळल्यास अमोल नलावडे यांच्या मो. नं.९६६५७७११८ संपर्क करावा खुलताबाद पोलीस स्टेशनचे निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास बाजार सावंगी पोलीस चौकीचे जमादार नवनाथ कोल्हे, दिलीप बनसोड, संजय सपकाळ करत आहे.

## पिंपळवाडी पिराची गावात नागरिकांचे हाल, घरात शिरले पावसाचे पाणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी/ प्रतिनिधि/ हारून/ शेख/** पैठण तालूक्यातील पिंपळवाडी पिराची दि.१४ सप्टें ते १५ सप्टें रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे नागरिक बेहाल झाले आहेत. ६०ते७०घरात पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहीत्य अन्नधान्य वाहुन गेले आहे पाणी ग्रस्त नागरीकांची पुढिल काहीच व्यवस्था नसल्याने नागरिक चिंतीत आहे.तरी तहसीलदार यांनी तात्काळ पाहणी करुन पंचनामे करावेत अणि नागरीकांना योग्य ती मदत मिळावी अशी ग्रामस्थांची मागणी आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी कोणतीही व्यवस्था नसल्याने पाणी थेट घरातच शिरले आणि लाखोंचे नुकसान झाले. घरात २ते३ फुटापर्यत पाणी साचल्याने साप विंचवाच्या भीतीने नागरिका मध्ये खळबळ



उडाली आहे.वीर एकलव्य चौकातील आदिवासी समाजाच्या नागरीकांच्या झोपड्या आणि शेड मध्ये पाणी शिरुन बरेचसे नुकसान झाले आहे.भील्ल आदिवासी समाजाचे अनेक संसार उद्वस्त अणि एवढे नुकसान होऊन देखील पाहणी साठी कोणीही आलेले नाही आमच्या समजाची थोडीही काळजी घेतली जात नाही एवढीच खंत वाटते अशी प्रतिक्रिया एकलव्य संघटनेचे तालुकाध्यक्ष छोटू मोरे यांनी दिली.

## बाबासाहेब थोरात यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर/ प्रतिनिधी/** तालुक्यातील फकीरा बाद वाडी येथील सेवानिवृत्त तलाठी बाबासाहेब निवृत्ती थोरात वय ६० वर्ष यांचे रविवार रोजी सायंकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांनी वैजापूर तालुक्यात तलाठी (आप्पा) म्हणून काम केले होते.

जालना शहरात दिनांक- १५ - ९- २०२५ रोजी संध्याकाळी सहाच्या सुमारास पावसाने जोरदार हजेरी लावून लोकांची तारांबळ उडवली.छायाचित्र किरण खानापुरे




# महाराष्ट्र पुरुष संघास रौप्य तर महिला संघास कांस्य

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारतीय सॉफ्टबॉल असोसिएशन अंतर्गत गाझियाबाद सॉफ्टबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १५व्या वरीष्ठ पुरूष/महिला राष्ट्रीय सॉफ्टबॉल फेडरेशन कप स्पर्धा दि.१२ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर २०२५ दरम्यान,एच.एल. एम ग्रुप इन्स्टिट्यूट गाझियाबाद(युपी) येथे संपन्न झाल्या असून या स्पर्धेत पंजाब पुरुष संघाने सुवर्ण पदक, महाराष्ट्र संघाने रौप्य तर मध्यप्रदेश संघाने कांस्य पदक प्राप्त केले तर महिलांच्या गटात मध्यप्रदेश सुवर्ण, पंजाब रौप्य तर महाराष्ट्र संघाने कांस्य पदक प्राप्त केले.

बक्षीस समारंभ फारुक आलम (आय. पी.एस अधिकारी) अनुज अग्रवाल (डायरेक्टर) धीरज शर्मा भारतीय सॉफ्टबॉल असो.चे माजी सेक्रेटरी एल.आर मौर्य,डॉ. प्रवीण अनावकर (सचिव), सॉफ्टबॉल इंडिया टेक्निकल कमिटी चे चेअरमन व आंतरराष्ट्रीय पंच सॉफ्टबॉल व बेसबॉल ५ चे मुकुल देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. पुरुष गटाच्या अंतिम सामन्यात पंजाब संघाने महाराष्ट्र संघास (३-०) होमरन च्या फरकाने पराभूत केले.पुरुषांच्या आज झालेल्या अंतिम सामन्यात ऋत्विक कुडवे ह्यांनी भेदक पिचिंग केली व कल्पेश कोल्हे ह्याने उत्कृष्ट क्षेत्ररक्षण तसेच व्यंकटेश झिपरे,सौरभ टोकसे,अभिषेक सेलोकर, यांनी पूर्ण स्पर्धेत उत्कृष हिटिंग करून सर्वांचे लक्ष वेधले. महिला खेळाडू मध्ये महाराष्ट्र संघकडून करिष्मा कुडचे, प्रीती कांबळे,सई जोशी, राक्षा शिंदे यांनी उत्कृष्ट




हिटिंग बरोबर अंजली पवार ने पीचींग करत संघाना विजय प्राप्त करून देण्यास महत्त्वाचे योगदान दिले.

या विजयी संघास प्रशिक्षक म्हणून आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी क्रीडा मार्गदर्शक किशोर चौधरी, आंतरराष्ट्रिय खेळाडू प्रशिक्षक प्रा.जयंत जाधव,दीपक खंदारे तर व्यवस्थापक म्हणून भीमा मोरे,चेतन चौधरी ह्यांचे मार्गदर्शन लाभले.

अंतिम सामन्यात शेषराज खेडकर,सुरेश रैना, विजेश कुमार,पवन कुमार, सुयोग कल्पेकर,एम.बद्रीनारायण,शफनास एन,यांनी पंचाची भूमिका निभावली.या विजयाबद्दल महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे अध्यक्ष गिरीश महाजन, सचिव डॉ.प्रदीप तळवेलकर,सहसचिव प्रशांत जगताप, गोकुळ तांदळे, देविदास पाटील, सुरजसिंग येवतीकर, रमाकांत बनसोडे, विकास टोणे, नितीन पाटील दीपक रुईकर,गणेश बेट्टदे आदींनी शुभेच्छा दिल्या.


## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
**(फक्त सभासदांसाठी)**

**महोदय,**

मातोश्री महिला अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि विहामांडवा. शाखा विहामांडवा ता. पैठण जि. छ. संभाजीनगर या संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, दि. ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ अखेर च्या सहकारी वर्षासाठी तिसरी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवर दिनांक २९/०९/२०२५ रोजी दुपारी ०१.०० वाजता मेन रोड सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया समोर मातोश्री महिला अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि विहामांडवा

शाखा विहामांडवा येथे संस्थेच्या अध्यक्षा योगिता हनुमान लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासद बंधु- भगिनींनी सर्वसाधारण सभेस उपस्थित रहावे हि विनंती.

**सभे पुढील विषय-**

१) मागील सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

(२) सन २०२४- २०२५ या कार्यकारी मंडळाचा अहवाल तेरीज पत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रकास मान्यता देणे बाबत.

३) सन २०२४ २०२५ चा ऑडिट मेमो व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

४) सन २०२४ - २०२५ च्या नफा विभागणीस मान्यता देणे बाबत.

५) सन २०२५ २०२६ चे अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत.

६) सन २०२४ २०२५ च्या नवीन सभासदांना मान्यता देणे.

७) दिनांक ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकापेक्षा कमी उ

८)सन २०२५ २०२६ साठीच्या लेखापरिक्षकास मान्यता देणे बाबत.

९) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुउपस्थित सभासदांची रजा मंजुर करणे बाबत.

-जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे

१०) अधिकृत भाग भांडवल चौदा लाख रुपयांवरून पन्नास लाख रुपया पर्यंत मान्यता देणे.

११) कर्ज वाटप मर्यादा एक लाख पन्नास हजार रुपया वरून पंधरा लाख रुपये करण्यास मान्यता देणे.

१२) मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दि. २९/०७/२०२५ रोजीच्या सूचनेनुसार नवीन सुधारित आदर्श उपविधी स्वीकारण्याबबत..

१३) उपविधी मध्ये आवश्यक दुरुस्ती करणे बाबत

१४) ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करणे मा. अध्यक्षांच्या परवानगीने...

**स्वाक्षरीत/-**
**मानद सचिव**
**(संचालक मंडळाच्या मान्यतेवरून)**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चा नियम क्र. २२ प्रमाणे प्रारंभी गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल, त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२. सभासदांना विधायक सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी सभेपूर्वी ५ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयामध्ये लेखी स्वरुपात किंवा संस्थेचा मेल आयडी matoshriurbanvihamandwagmail.com वर पाठवाव्यात, नंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

३.वैयक्तिक तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

४.थकीत सभासदांना सर्वसाधारण सभेच्या चर्चेत भाग घेता येईल, परंतु त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

५.अहवालामध्ये काही मुद्रण दोष आढळल्यास ते सभास्थानी दुरुस्त करण्यात येईल.

६. ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाता येणार नाही अशा सभासदांनी ७ दिवसापुर्वी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत रजेचा अर्ज दाखल करावा.



## वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस
**(फक्तसभासदांसाठी)**

**महोदय,**

धन श्री अर्बन को-ऑपक्रेडिट सोसायटी लि.शाखा टाकळी अंबड ता.पैठण जि.छ.संभाजीनगर यासंस्थेच्या सर्वभागधारक सभासदांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, **दि.०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५** अखेरच्यासह कारीवर्षासाठी पहिली/दूसरी/ तिसरीवार्षिक सर्व साधारण सभा बुधवार **दिनांक-२९/०९/२०२५ रोजी दुपारी०१.०० वाजता** मुख्य कार्यालय धन श्री अर्बन का-ॅऑपक्रेडिटद सोसायटी लि. टाकळी अंबड

मुख्य कार्यालय येथे संस्थेच्या अध्यक्ष श्री. शंकरराव उत्तमराव काळे यांचे अध्यक्षते खाली आयोजित केलेली आहे.तरी सर्व सभासद बंधु-भगिनींनी सर्व साधारण सभेस उपस्थित रहावे हि विनंती.

**सभे पुढील विषय-**

१) मागील सर्व साधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

२)सन २०२४-२०२५ या कार्यकारी मंडळाचा अहवालतेरीज पत्रक, नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रकास मान्यता देणे बाबत.

३) सन २०२४-२०२५ चा ऑडिट मेमो व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

४) सन २०२४-२०२५ च्या नफा विभागणीस मान्यता देणे बाबत.

५) सन २०२५-२०२६ चेअंदाजपत्रकासमान्यतादेणेबाबत.

६) सन २०२४-२०२५ च्या नवीन सभासदांना मान्यता देणे.

७) दिनांक ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ याआर्थिक वर्षात अंदाजपत्रका पेक्षा कमी-जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.

८) सन २०२५-२०२६ साठीच्या लेखा परिक्षकास मान्यता देणे बाबत.

९) वार्षिक सर्व साधारण सभेस अनुउपस्थित सभासदांची रजा मंजुर करणे बाबत.

१०) अधिकृत भाग भांडवल चौदा लाख रुपयांवरून पन्नास लाख रुपया पर्यंत मान्यता देणे.

११) कर्ज वाटप मर्यादा एक लाख पन्नास हजार रुपया वरून पंधरा लाख रुपये करण्या समान्यता देणे.

१२)मा. सहकार आयुक्त व निबंधकसह कारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दि . २९/०७/२०२५ रोजी च्या सूचने नुसार नवीन सुधारित आदर्श उपविधी स्वीकारण्या बबत.

१३) उपविधीमध्ये आवश्यक दुरुस्ती करणे बाबत.

१४) ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करणे मा. अध्यक्षांच्या परवानगीने

**स्वाक्षरीत/-**
**मानद सचिव**
**(संचालक मंडळाच्या मान्यते वरून)**

**टिपः** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चा नियम क्र. २२ प्रमाणे प्रारंभी गणसंख्ये अभावी सभातहकुब झाल्यासतीच सभात्याच ठिकाणी अर्ध्यातासा नंतर घेण्यात येईल, त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२. सभासदांना विधायक सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी सभेपूर्वी ५ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयामध्ये लेखी स्वरुपात किंवा संस्थेचा मेल-आयडी dhannshriurban1506gmail.com वर पाठवाव्यात,तद नंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

३. वैयक्तिक तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

४. थकीत सभासदांना सर्वसाधारण सभेच्या चर्चेत भागघेता येईल, परंतु त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

५. अहवालामध्ये काही मुद्रणदोष आढळल्यास ते सभास्थानी दुरुस्त करण्यात येईल.

६. ज्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाता येणार नाही अशा सभासदांनी दि. ३०/०९/२०२४ पुर्वीसंस्थेच्या कार्यालयीन वेळेत रजेचा अर्ज दाखल करावा.

संचालकाचीनावे

| | |
|---|---|
| १.शंकरराव उत्तमराव काळे | चेअरमन |
| २.पोपट शंकर काळे | व्हाचेअरमन |
| ३.भिवराज जिजा खडके | सचिव |
| ४.एकनाथ कडुबा काळे | संचालक |
| ५.अशोक एकनाथ काळे | संचालक |
| ६.विशाल पोपट काळे | संचालक |
| ७.आशा राजू काळे | संचालिका |
| ८.योगिता ज्ञानेश्वर काळे | संचालिका |
| ९.संचालिका | |
| १०.संचालक | |

## संक्षिप्त

### वक महोत्सवाचे थाटात उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा



विद्यापीठाचा जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे थाटात उद्घाटन करण्यात आले. यावेळी कुलगुरू विजय फुलारी यांना माजी बिसीयुडी संचालक प्राचार्य डॉ भागवत कटारे यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

या महाविद्यालयाचे प्रांगणात १५ व १६ सप्टेंबर रोजी अंबड येथील मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयात होत आहे. यंदापासून जिल्हानिहाय युवक महोत्सव घेण्यात येत आहे. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते सोमवारी सकाळी उद्घाटन करण्यात आले.. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माजी बीसीयुडी संचालक प्राचार्य डॉ .भागवतराव कटारे हे होते. तर सिने गीतकार डॉ विनायक पवार , व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ भारत खंदारे , संचालक डॉ.कैलास अंभुरे व प्राचार्य डॉ.मिलिंद पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती.

मानपत्र देऊन कुलगुरुंचा गौरव

कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांची नुकतीच पष्टाब्दीपूर्ती झाली. यानिमित्त मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्यावतीने मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांचा माजी बीसीयुडी संचालक डॉ.भागवत कटारे यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरविण्यात आले. दीड वर्षांच्या कारकिर्दीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला 'नॅक ए प्लस' मानांकन सह राष्ट्रीय स्तरावर नाव लौकिक प्राप्त केल्याबद्दल गौरव करण्यात आला.

### कलश शिष्यवृत्ती योजनेला १ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/कलश सीड्स फाउंडेशनतर्फे जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता आर्थिक दुर्बल घटकातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी एकूण १८ व्यावसायिक कोर्सेससाठी कलश सीड्स शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. त्यासाठी १२ सप्टेंबरपर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. मात्र, अनेक कोर्सेसची प्रवेश प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्याने या योजनेला १ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.एमबीबीएस, इंजीनियरिंग, एम.टेक. आयसीटी जालना, सीए/ सीएस/आयसीडब्ल्यूए फाउंडेशन, सीए/सीएस/आयसीडब्ल्यूए प्रथम आणि द्वितीय वर्ष, एलएलबी (पाच वर्षाचा एकत्रित अभ्यासक्रम), बी.फार्मसी, बी.एस्सी. एग्रीकल्चर, बी.एस्सी. नर्सिंग, पॉलिटेक्निक आणि आयटीआय आदी १८ कोर्सेससाठी ही शिष्यवृत्ती योजना असून, फक्त उपरोक्त अभ्यासक्रमाला यावर्षी प्रथम वर्षात प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना या योजनेत सहभागी होता येणार आहे. १२ सप्टेंबर ही अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख होती. मात्र, बहुतांश कोर्सची प्रवेश प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्याने कुणीही विद्यार्थी योजनेपासून वंचित राहू नये म्हणून ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी १ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

दहावी किंवा बारावीची परीक्षा जालना जिल्ह्यातून उत्तीर्ण केलेले आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपयांच्या आत असलेल्या विद्यार्थ्यांनी या योजनेचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा आणि अधिक माहितीसाठी जालना शहरातील व्यंकटेशनगरमधील जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या कार्यालयात किंवा प्रकल्प समन्वयक रुक्मिणीकांत दीक्षित (मो. ९४०४६०७५७५) व दिलीप केंद्रे (मो. ७०२०५१८७६८ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कलश सीड्सचे चेअरमन सुरेश अग्रवाल, व्यवस्थापकीय संचालक समीर अग्रवाल, संचालिका सौ. वर्षा अग्रवाल, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, अध्यक्ष सुनील रायठठ्ठा, सचिव सुरेश कुलकर्णी यांनी केले आहे.

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/जिल्ह्यात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन, शारदीय नवरात्रौत्सव, आंदोलने या सण, उत्सव आणि इतर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि. १२ सप्टेंबर २०२५ ते २५ सप्टेंबर पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २५ सप्टेंबर रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील विकासाची कामे तात्काळ पार पाडावी - खासदार डॉ.कल्याण काळे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/ जल जीवन मिशन, महावितरण, ग्रामीण पाणीपुरवठा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनांसह विविध योजनेंतर्गंत मंजूर असलेली लोकहिताची विकास कामे वेळेत पार पाडावीत, अशा सूचना जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) चे अध्यक्ष तथा खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिल्या. जालना जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात आज आयोजित जिल्हा समन्वय व सनियंत्रण समिती म्हणजेच 'दिशा' समितीच्या आढावा बैठक पार पडली. यावेळी खासदार डॉ. काळे बोलत होते.

बैठकीला सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, आमदार नारायण कुचे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम., अपर जिल्हाधिकारी रिता मैवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुनिल पठारे, यांच्यासह समिती सदस्य यांची यावेळी उपस्थिती होती.

लोकहिताची विकास कामे करतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींच्या कुठल्याही दबावाला बळी न पडता जिल्ह्यातील ग्रामीण रस्त्यांच्या कामासह इतरही कामे तातडीने सुरु करुन वेळेत पुर्ण करावीत. ग्रामीण रस्ते हे गावातील गावकरी व शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे रस्ते असून त्यांच्यासाठी ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना खासदार डॉ.काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनेतील कामामध्ये बराच कालावधी उलटल्यानंतरही कोणतीच प्रगती झाली नसून, या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबद्दल खासदार डॉ.काळे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच या योजनेतंर्गत काही गावात झालेल्या कामांची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, असे आदेशही त्यांनी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेतील शहरातील व ग्रामीण भागातील दिल्या जाणाऱ्या अनुदानाच्या फरकाबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत स्वयं सहायता गट स्थापन झालेल्या बचतगटांना बँकांकडून निधी मिळण्यास येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात. अशी सुचनाही खासदार डॉ. काळे यांनी केली. बैठकीत समितीचे अध्यक्ष डॉ.काळे यांनी प्रधानमंत्री पीक विमा योजना,राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता योजना, स्वच्छ भारत मिशन, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना, राष्ट्रीय आरोग्य अभियान, सर्व शिक्षा अभियान, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, मध्यान्ह भोजन योजना, संजय गांधी निराधार योजना, डिजीटल भारत, सर्व शिक्षा अभियान, जल जीवन मिशन, उमेद, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, महावितरण, स्वामित्व हक्क, राष्ट्रीय सामाजिक सहाय्यता कार्यक्रम, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत विविध लाभाच्या योजना आदी योजनांचाही यावेळी आढावा घेतला. जालना महानगर पालिकेच्या हद्दीतील प्रॉपर्टी कार्डच्या कामासह इतर कामांबाबतही दिशा समितीचे अध्यक्ष तथा खासदार डॉ काळे यांनी विविध सुचना केल्या.

केंद्रीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी दिशा समिती काम करत असते. यात एकूण २२ विषय समाविष्ट आहेत. केंद्राच्या विविध योजना तालुकास्तरावर प्रलंबित न ठेवणे तसेच विकास कामात दिरंगाई झाल्यास तपासणी करणे आदी कामे दिशा समितीकडून करण्यात येत असते. तसेच जिल्ह्यातील बेघर असणाऱ्या गरजु लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ प्राधान्याने देण्यात येईल. अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली.

केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेतील कामे, लाभार्थ्यांची संख्या जाणून घेत उपस्थित लोकप्रतिनिधी व सदस्यांनी विविध सूचना केल्या. यावेळी बैठकीला संबंधित उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, अभियंता, जिल्हा ग्रामीण विकास योजनेचे अधिकारी यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

## शहराचा विकास आणि सुशोभीकरणात रोटरीचे मोलाचे योगदान-संतोष खांडेकर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/ जालना शहराच्या पर्यावरणासाठी एक सुंदर आणि उपयुक्त पाऊल उचलत रोटरी क्लब ऑफ जालनाने महापालिकेच्या सहकार्याने एस. आर. जे. स्टीलच्या सीएसआर फंडातून देऊळगाव राजा रोडवरील स्व. बाबुराव काळे चौक ते अग्निशमन दल या मार्गावर'शांती घन वन' हा प्रकल्प विकसित केला असून त्याचे लोकार्पण सोमवार, दि. १५ सप्टेंबर रोजी महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्या हस्ते झाले. तसेच या ठिकाणी शांती स्तंभ स्थापन करून 'शांतता सप्ताह'चा शुभारंभही करण्यात आला.

अध्यक्षस्थानी रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातूरे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून एस. आर. जे. वर्ल्ड ऑफ़ स्टीलचे संचालक सुरेंद्र पित्ती, महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण यांची तर व्यासपीठावर क्लबच्या अध्यक्षा वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, प्रकल्प प्रमुख शिवरतन मुंदडा, सुरेश मगरे, हेमंत ठक्कर यांची उपस्थिती होती. आयुक्त संतोष खांडेकर म्हणाले, रोटरीसारख्या संस्थेमुळे शहराचा विकास आणि स्वच्छतेस मदत मिळते. शांती घन वनमुळे जालना शहर अधिक सुंदर आणि पर्यावरणपूरक बनेल. अशा उपक्रमांस महापालिकेचे पूर्ण सहकार्य राहील. प्रांतपाल सुधीर लातूरे यांनी पर्यावरणाचा ऱ्हासाबद्दल फक्त चिंता व्यक्त न करता प्रत्यक्ष कृती करणे गरजेचे आहे. शांती घन वन हा त्याचे उत्तम उदाहरण आहे, असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकपर भाषणात क्लबच्या अध्यक्ष वर्षा पित्ती म्हणाल्या की, रोटरीने जालन्यातील दोन ठिकाणे विकसित करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. त्यापैकी तीन हजार वर्ग फूट जागेत २ हजार भारतीय प्रजातीची झाडे लावून शांती घन वन आम्ही विकसित करत आहोत. तीन वर्षानंतर या ठिकाणी घनदाट जंगल तयार होईल. त्यानंतर या झाडांना खत आणि पाण्याची आवश्यकता भासणार नाही. एकमेकांना ही झाडे सांभाळून घेत आपोआप संगोपन आणि संवर्धन होत राहील. तोपर्यंत शांती घन वनाचे संवर्धन आणि शहराच्या स्वच्छतेसाठी प्रत्येकाने खारीचा वाटा उचलावा, अशी साद वर्षा पित्ती यांनी घातली.

याप्रसंगी शांती घन वन प्रकल्पासाठी अहोरात्र परिश्रम घेणारे प्रकल्प प्रमुखांसह सामाजिक कार्यकर्ते उदय शिंदे, विनोद यादव, अग्नीशमन अधिकारी माधव पानपट्टे,मनपा स्वच्छता विभाग प्रमुख चांदणे, स्वच्छता निरिक्षक राहूल हिवाळे, डॉ. दीपक बगडिया, प्रमोद झांजरी, गोविंद गोयल, दीपक पंच, संवर्धनासाठी स्वतःहून वेळ देण्याची तयारी दर्शविणारे आसिफ शेख आदींचा यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र अग्रवाल आणि डॉ. दीपक बगडिया यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार क्लबचे सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत यांनी मानले. याप्रसंगी रोटरी परिवारातील सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तीन वर्षात होणार घनदाट जंगल...

घन वन प्रकल्पाची संकल्पना विशद करताना प्रकल्प प्रमुख सुरेश मगरे म्हणाले की, शांती घन वन' हा प्रकल्प पर्यावरणाची काळजी घेण्याचा एक सुंदर आणि दीर्घकालीन प्रयत्न आहे. येत्या काही वर्षांत जालना शहरात निसर्गाची नवी चाहूल जाणवणार आहे. घन वन ही जापानचे वनस्पती शास्त्रज्ञ अकिरा मियावाकी यांची संकल्पना असून, त्या अंतर्गत त्यांनी जगभरात तीन कोटी झाडे लावलेली असून, या प्रकल्पाचे भारतातील व्हॅलेंटियर सुधेंदू शर्मा हे आहेत. नैसर्गिक जंगलाच्या तुलनेत घन वनातील झाडांची वाढ दहापट लवकर होते तर वन तीस पट जास्त घनदाट बनते. शंभर टक्के जास्त जैवविविधता प्रदान करते. अशा प्रकारचे एक एकरातील घन वन वर्षाला चार हजार किलो कार्बनडाय ऑक्साइड शोषून घेते. अशा प्रकारचे दोन घन वन यापूर्वी जालन्यातील एस आर जे स्टील आणि कालिका स्टील या कंपनीने सुरू केलेले असून, रोटरीचा हा तिसरा प्रकल्प आहे. येत्या तीन वर्षात या ठिकाणी मोठे जंगल दिसून येईल आणि हा परिसर हिरवाईने नटलेला राहणार असल्याने विरंगुळ्याचे एक प्रमुख केंद्र बनेल, असे सुरेश मगरे म्हणाले.




### भोकरदन येथे लोक अदालतीचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/उपविभागीय अधिकारी, भोकरदन यांच्या न्यायालयात प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक प्रकरणांचा निपटारा व्हावा तसेच नागरिकांना जलद न्याय मिळावा या उद्देशाने दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत महसूल सेवा पंधरवाडा अंतर्गत न्याय आपल्या दारी या संकल्पनेतून रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, भोकरदन येथे लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. तरी नागरिकांनी अर्धन्यायीक प्रकरणामध्ये तातडीने न्याय मिळवून देण्यासाठी लोकअदालतीचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रासह वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बी.सरवनन यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### पोलिस पाटील भरतीसाठी आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/जालना जिल्ह्यातील पोलिस पाटील पद भरती-२०२५ साठी अर्हता धारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. तरी इच्छुकांनी आपले अर्ज https://jalnapp.recruitonline.in या संकेतस्थळावर सादर करावेत, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा पोलिस पाटील निवड समितीचे अध्यक्ष यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.ऑनलाईन अर्ज करण्यास दि.१५ सप्टेंबर २०२५ पासून सुरुवात करण्यात आलेली आहे. तर ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख दि.३० सप्टेंबर २०२५ अशी आहे. पोलिस पाटील पदासाठी खुला प्रवर्ग ८०० तर मागास प्रवर्गासाठी ६०० रुपये शुल्क ठेवण्यात आले आहे. लेखी परीक्षा दि.१२ ऑक्टोबर २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. परीक्षेसाठी उमेदवार हा दहावी उत्तीर्ण, संबंधित गावचा रहिवासी, वय २५ ते ४५ दरम्यान असावे. तसेच जाहिरातीनूसार इतर कागदपत्रे आवश्यक आहेत. पोलिस पाटील भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर जाहिरात https://jalnapp.recruitonline.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचुनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावेत, असेही कळविले आहे.

## स्वतंत्र भारतामध्ये विनाअट सामील होऊन मराठवाड्यातील जनतेने चुक केली काय?- बोरसे गुरुजी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/ दोन दिवसानंतर १७ सप्टेंबर रोजी आपण आता मराठवाडा मुक्ती दिन साजरा करणार आहोत. मागे वळून पाहतांता असे निदर्शनात येते की, मराठवाड्याच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्याच्या फक्त वल्गना करण्यात आल्या आणि मराठवाड्याच्या जनतेच्या तोंडाला पाने पुसण्यात आली. खरंच आमच्या मराठवाड्यातील जनता पूर्वीपासून अतिशय सहनसिल देशभक्त आहे. त्यांनी कोणतेही अट न घालता ज्यावेळेस भारत स्वतंत्र झाला त्यावेळेस विनाअट मराठवाडा स्वतंत्र भारतामध्ये सामील झाला.खरे म्हणजे त्या वेळचे जे आमचे स्वतंत्र सेनानी होते जे आमचे मराठवाड्याचे नेते होते ते अटी घालू शकले असते आणि मराठवाड्याचा विकासाचा अजेंडा पुढे ठेवू शकले असते. देशाभिमान राष्ट्रनिष्ठा यामुळे त्यावेळच्या लोकनेत्यांनी कोणत्या कोणत्याही अटी न घालता प्रथम प्राधान्य देशाला देवुन स्वतंत्र भारतामध्ये सामील होण्याचे ठरवले . मराठवाडा स्वतंत्र भारतामध्ये सामील झाला. परंतु मराठवाड्याच्या वाट्याला सतत उपेक्षाच आलेली आहे. आज कोणत्याही क्षेत्राचा विचार करा, शैक्षणिक क्षेत्रामध्ये कृषी क्षेत्रामध्ये औद्योगिक क्षेत्रामध्ये सर्वच क्षेत्रांमध्ये मराठवाडा इतर भागांपेक्षा कोसो दूर आहे.आता मराठवाड्यामध्ये जो आरक्षणाचा लढा लढला जात आहे त्याला मराठवाड्याची उपेक्षा हेच कारण आहे. अगोदर रजाकारांनी लुटले त्यातून जनता सावरते न सावरते तो भारतामध्ये लोकशाही राज्य आले. मराठवाड्यातील जाणत्या देशभक्त जनतेला आनंद झाला. आनंदाचे गीत मराठवाड्यामध्ये गायले गेले. परंतु लोकशाहीमध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी सुद्धा मराठवाड्याची उपेक्षाच केली . स्वतःच्या स्वार्थासाठी जनतेला वापरून घेतले. जनतेचा एकही प्रश्न न सोडवता फक्त स्वतःचा स्वतः च्या कुटुंबाचा आणि सोयऱ्याधायर्यांचाच प्रश्न सोडवण्यामध्ये गुंतले. काही मोजके नेते सोडता मराठवाड्यातील लाचार नेत्यांच्यामुळे महाराष्ट्राकडून सतत मराठवाड्याची उपेक्षा झालेली आहे. त्यामध्ये पूर्वीपासून शिक्षणाच्या समस्या सोडवल्या गेल्या नाहीत आता आता शिक्षणासाठी काही तरतूदी झाल्या त्या सुद्धा पुरेशा नाहीत . मराठवाड्यातील नोकरशाहीचा विचार केला तर स्थानिक भूमिपुत्र आजही मराठवाड्याच्या प्रशासनामध्ये तुलनेने अतिशय कमी आहेत. त्यामानाने इतर भागातून पश्चिम महाराष्ट्र तसेच विदर्भातून मोठ्याप्रमाणात नौकरवर्ग मराठवाड्यामध्ये नोकरी करत आहे.शिक्षण नाही!असले तरी नौकरी नाही नोकरी नाही त्यामुळे लग्नाचा प्रश्न .असे एक ना अनेक प्रश्न मराठवाड्यामध्ये सध्या चर्चेत असतानाही राजकर्ते या गोष्टीकडे लक्ष देत नाहीत. मरणाचे कष्ट मेहनत करूनही आमच्या वाट्याला सतत दुःख दारिद्र्य येत आहे. कृषी क्षेत्राचा विचार केल्यास न परवडणारी शेती शेतकरी करत असून सर्वाधिक आत्महत्या मराठवाड्यामध्ये झालेल्या आहेत. आजही मराठवाडा भ्रष्टाचाराने होरपळत आहे. स्थानिक नेते मात्र स्वतःचा स्वार्थ आणि स्वतः कुटुंबाचा स्वार्थ पाहण्यात आणि पैसे कमाव धन्यता मानत आहे.आता त्यांच्या रजाकिरीला जनता तोंड देत आहे. जनतेला वाऱ्यावर सोडून त्यांनी इतर नेत्यांची लाचारी पत्करलेली आहे औद्योगिक क्षेत्रामध्ये फक्त नावाला औद्योगिक शब्द उच्चारला गेला परंतु पाहिजे त्या प्रमाणामध्ये कारखानदारी मराठवाड्यात उभे राहू शकले नाही. त्या ठिकाणी सुद्धा आमच्या नेत्यांनी लक्ष दिलेले नाही.

### स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी**/ महिला आरोग्य हे कुंटुंब आणि सामाजिक आरोग्याशी निगडीत आहे. याच उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली दि.१७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोंबर २०२५ या कालावधीत ' स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे विशेष राबविण्यांत येणार आहे. जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, आयुष्यमान आरोग्य मंदिरे, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, जिल्हा स्त्री रुग्णालय येथे या अभियाना अंतर्गत महिलांसाठी आरोग्य शिबीरे आयोजित केली जाणार आहे. या शिबीरामध्ये महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन आरोग्य तपासणी व उपचारात्मक सेवा देण्यांत येणार आहे. मधुमेह, रक्तदाब, गर्भाशय मुखाचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग या सारख्या असंसर्गजन्य रोगांची तपासणी, ॲनेमिया, गर्भवती महिलांची प्रसुतीपुर्व व प्रसुती पश्चात तपासणी, माता व बाल संरक्षण कार्ड वितरण, रक्तदान शिबीरे, आयुष्यमान भारत कार्ड तसेच महिलांसाठी पोषण आहार, मासिक पाळी स्वच्छता, मानसिक आरोग्य व निरोगी जीवनशैली याविषयी मार्गदर्शन करुन जनजागृती व समुपदेशन करण्यांत येणार आहे. जागरुकता वाढविण्यासाठी शिबीरांच्या आयोजनामध्ये लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे. कुटुंब प्रमुखांनी आपल्या घरातील सर्व महिलांना आरोग्य तपासणीसाठी प्रोत्साहन द्यावे. या अभियानामुळे गंभीर आजारांचे लवकरात लवकर निदान झाल्यामुळे योग्य वेळी उपचार सुरु होतील. असे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813